**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.**

**जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळ गेवराई संचलित,**

# कला व विज्ञान महाविद्यालय,पाटोदा.

ता.पाटोदा, जि. बीड.

## विशेष शिबीर अहवाल

**सन 2022 - 2023**

# राष्ट्रीय सेवा योजना वार्षिक अहवाल

**प्राचार्य**

डॉ.विश्वास कल्याणराव कदम

कार्यक्रमाधिकारी

**प्रा. डॉ.एम. आर. शिंदे**

**प्रा. जे. बी. रकटे**

**NOT ME.. BUT YOU..**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

**जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित,**

## कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा.

### राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने

### 'युवकांचा ध्यास ग्राम - शहर विकास'

**दिनांक १७/०१/२०२३ते २३/०१/२०२३**

**मौजे- महासांगवी, ता.पाटोदा,जि.बीड.**

**विशेष शिबीर अहवाल – सन 2022 – 2023**

**प्रस्तावना–**

सन 2022 – 2023 या शैक्षणिक वर्षाचा विशेष शिबीर अहवाल सादर करताना विशेष आनंद होत आहे. आमच्या महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मौजे महासांगवी ता. पाटोदा जि. बीड या दत्तक गावात प्रति वर्षाप्रमाणे सन 2022-23 मध्ये 'युवकांचा ध्यास ग्राम - शहर विकास' विशेष युवक-युवती शिबिर आयोजित करण्यात आले. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना श्रमप्रतिष्ठा, पर्यावरण संरक्षण, आरोग्य जनजागृती, अंधश्रद्धा निर्मूलन, लोकसंख्या शिक्षण, नैसर्गिक संसाधन जनजागृती, श्रमसंस्कार, जलसाक्षरता, जलव्यवस्थापनाबरोबर समाजातील लोकात सहभागी होण्यासाठी महाविद्यालयाच्या वतीने या शिबिराचे आयोजन दिनांक १७/०१/२०२३ ते २३/०१/२०२३ यादरम्यान उत्साहात आयोजित करण्यात आले. या शिबिराच्या कार्यक्रमाचा अहवाल सादर करताना विशेष आनंद होत आहे, तो खालील प्रमाणे.

दिनांक १७/०१/२०२३ - मंगळवार -शिबिराचा उद्घाटन समारंभ –

जयभवानी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मौजे महासांगवी ता. पाटोदा जि. बीड या दत्तक गावात प्रति वर्षाप्रमाणे सन 2022-23 मध्ये दिनांक १७/०१/२०२३ रोजी 'युवकांचा ध्यास

ग्राम - शहर विकास' विशेष युवक-युवती शिबिराचा उद्घाटन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कदम सर हे होते तर उदघाटक म्हणून संत मीराबाई संस्थान महासांगवीच्या मठाधिपती ह.भ.प. राधाताई महाराज ह्याउपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून महासांगवी गावच्या प्रथम नागरिक तथा सरपंच चैताली नामदेव सानप, उपसरपंच केशव गर्जे, उद्योगपती विलासराव जायभाये, मधुकर गर्जे, स्थानिक नियामक मंडळाचे सदस्य दिलीपराव जाधव, श्रीराम गर्जे, सरपंच नामदेव सानप, मधुकर गर्जे तसेच व्यासपीठावर महासांगवी गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.



सर्वप्रथम राष्ट्रपिता महात्मा गांधी व राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा. श्रीमती ज्योती रकटे यांनी केले. याप्रसंगी प्रास्ताविकातून शिबिरात आयोजित करण्यात आलेल्या विविध कार्यक्रमाचीमाहिती देण्यात आली. शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना संत मीराबाई संस्थान महासांगवीच्या मठाधिपती ह. भ.प. राधाताई महाराज यांनी युवकांनी ग्रामीण विकासाचा ध्यास घ्यावा असे प्रतिपादन केले. पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, आजचा युवक दिशाहीन होऊ पाहत आहे तेव्हा आपण अध्यात्माचीसाथ घेऊन

स्वच्छतेबरोबर ग्रामीण विकासाचा ध्यास घ्यावा व या सात दिवसाच्या शिबिरातून राष्ट्रसेवा व समाजसेवेचा वसा घेऊन जा असे आवाहन विद्यार्थ्यांना केले.





शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना सौ. चैताली सानप सरपंच, महासांगवी म्हणाल्या की, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी सामाजिक मूल्य जपावीत. शिबिरासाठी आमच्या गावची निवड महाविद्यालयाने केली त्याबद्दल धन्यवाद मानून शिबिराला सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. शहराच्या दुसऱ्या प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना उद्योगपती मा. विलास जायभाय म्हणाले की राष्ट्रीय सेवा योजना समाजकार्याबरोबर राष्ट्रसेवा करण्याची संधी युवकांना देते. युवकांनी अशा शिबिरातून राष्ट्रीय एकात्मता व एकता, सामाजिक न्याय, श्रमदान ही मूल्ये जोपासावी.




शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कदम सर म्हणाले की, आम्ही पाच वर्षासाठी महासांगवीहे गाव दत्तक घेण्याची घोषणा केली. या शिबिराला जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल संत मीराबाई संस्थान महासांगवीच्या मठाधिपती ह. भ. प. राधाताई व ग्रामस्थांचे आभार व्यक्त केले. दिनांक १७/०१/२०२३ ते २३/०१/२०२३ या कालावधीत होणाऱ्या या शिबिरात दररोज उद्बोधन सत्र होणार आहेत. संध्याकाळी सांस्कृतिक कार्यक्रमाची मेजवानी मिळणार आहे तसेच स्वच्छता मोहीम, वृक्ष लागवड आदिकार्यक्रम होणार आहेत. तरी गावकऱ्यांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आव्हान केले. त्यानंतर राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी संत मीराबाई संस्थान परिसरात स्वच्छता मोहीम राबवून परिसर स्वच्छ केला.या कार्यक्रमाचे संचलन प्रा. डॉ. बंडू लोखंडे यांनी केले तर आभार प्रा. डॉ. अशोक देवगुडे यांनी मानले. हा उद्घाटन समारंभ यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाधिकारी प्रा. श्रीमती ज्योती रकटे, प्रा.डॉ. बंडू लोखंडे, कुणाल काळे, कू.दिव्या घुमरे, श्रीमती नाईकनवरे मावशी आदींनी विशेष परिश्रम घेतले.याप्रसंगी महाविद्यालयातीलप्रा. डॉ. सय्यद एस.आर., प्रा.डॉ. वंदन जाधव,प्रा. डॉ. भास्कर अहिरे, प्रा. डॉ.सुनील जाधव, प्रा. डॉ. प्रधान आर. जे., प्रा विनोद किर्दक, प्रा.डॉ. संभाजी जाधव, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आणि ग्रामस्थ उपस्थित होते.





 






**दिनांक १७/०१/२०२३ – मंगळवार - श्री. संतोष गर्जे यांचे 'फूल शेती लागवड व उत्पादन'-**

दुपारच्या बौद्धिक सत्रात श्री. संतोष गर्जे यांचे 'फूल शेती लागवड व उत्पादन' या विषयावर उदबोधन सत्र ठेवण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. बंडू लोखंडे सर हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री संतोष गर्जे यांची उपस्थिती होती. व्यासपीठावर प्रा. डॉ. संभाजी जाधव, कू. दिव्या घुमरे हे उपस्थित होते. प्रथमतः राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.






विशेष शिबिराच्या प्रथम दिवशी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना श्री संतोष गर्जे यांनी फूल शेती लागवड व उत्पादन याविषयावर मार्गदरशन केले. ते बोलताना म्हणाले की, फूल या पिकाची व्यापारी दृष्टीकोनातून केलेली शेती म्हणजे फुलशेती होय. फुलांच्या उत्पन्नातून आर्थिक लाभ मिळविणे हा फुलशेतीमागचा मुख्य उद्देश आहे. भारतात प्राचीन काळापासून ते आजपर्यंत मनुष्याच्या आयुष्यात फुलांना महत्त्वाचे स्थान आहे. फुले सौंदर्याचा अर्थ वाढवितात. आज फुलशेती महत्त्वाचे व्यापारी पीक म्हणून उदयास येत आहे. त्यामुळे अनेक शेतकरी, विशेषत: लहान शेतकरी, कमी भांडवलामध्ये फुलशेती करण्याकडे वळलेला आहे. फुलशेतीतून कमी

जागेतून नियमित उत्पन्न मिळते. त्यामुळे शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचाविण्यास मदत होत आहे. फुलांचा वापर केवळ सुशोभिकरणापुरता मर्यादित नसून अनेक फुलांपासून तेल, सुगंधी द्रव्य किंवा अत्तर, गुलकंद, गुलाब जल इत्यादी उत्पादने तयार केली जातात. फुलशेती हा शेतीला पुरक किंवा जोडव्यवसाय आहे. यातून चांगले उत्पन्न मिळून शेतकऱ्यांचा आर्थिक दर्जा सुधारतो. लोकसंख्या, रुढी-परंपरा, आवडीनिवडीमध्ये बदल इत्यादींमुळे मनुष्य जीवनात फुलांचा उपयोग वाढत आहे. त्यामुळे दिवसेंदिवस फुलांची मागणीही वाढत असल्यामुळे छोट्या फुलविक्रेत्यांपासून ते मोठ्या व्यावसायिकांचे उत्पन्न वाढत आहे. देशामध्ये फुलशेतीवर आधारित उद्योग स्थापित करून राष्ट्रीय अर्थव्यवस्थेमध्ये सुधारणा करण्यास मदत होते. फुले विदेशांत निर्यात करून विदेशी चलन मिळवून आर्थिक सुधारणा होते. फुलांचा वापर वेगवेगळ्या उद्योगांमध्ये होत असल्याने रोजगार संधी निर्माण होते, बेरोजगारीची समस्या काही प्रमाणात सोडविता येते. असे त्यांनी सांगितले. या बौद्धिक सत्राचा अध्यक्ष समारोप करताना प्रा. डॉ. बंडू लोखंडे सर यांनी फुलशेती हा व्यवसाय शाश्वत उपजीविकेसाठी लाभदायक आहे. पारंपारिक पिकांना जोड देऊन फुलशेतीतून वर्षभर उत्पन्न घेता येते. फुलशेती हा व्यवसाय कमी जागेत जास्त उत्पन्न मिळवून देते. फुलशेती उद्योगात स्थलांतर करण्याची आवश्यकता नसून गावातच पैसा मिळत असतो. या प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरार्थ्यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. या कार्यक्रमाचे संचलन, प्रास्ताविक आणि आभार रा. सो. यो. च्या स्वयंसेवक केले. याप्रसंगी मौजे महासांगवी येथील ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

**दिनांक १८/०१/२०२३ - बुधवार –'बालविवाह, बालहक्क आणि युवक'**

दिनांक १८/०१/२०२३ - बुधवार रोजी सकाळी गावात स्वच्छता अभियान राबविण्यात आले व स्वच्छतेचा संदेश गावकऱ्यांना देण्यात आला. त्याच बरोबर 'बालविवाह बाल हक्क आणि युवक' या संबंधी रॅली काढण्यात आली.







दुपारच्या बौद्धिक सत्रात 'बालविवाह बाल हक्क आणि युवक' विषयावर उदबोधन सत्र ठेवण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. गवारे एन.बी.सर होते तर प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. सुनील जाधव यांची उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. जरांगे एस.ए. सर उपस्थित होते तर व्यासपीठावर प्रा. आनंद भगत यांची उपस्थिती होती. प्रथमतः राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.



विशेष शिबिराच्या दुसऱ्या दिवशी प्रमुख वक्ते म्हणून बोलताना प्रा. डॉ. सुनिल जाधव सर यांनी समाजातील बालविवाह, बालहक्क आणि त्यांच्या समस्या यावर प्रकाश टाकला. महिलांनी शिक्षणाच्या माध्यमातून समोर येणे आवश्यक आहे त्यासाठी प्रत्येक घरातील मुलगी शिकली पाहिजे. शिक्षणाने अन्यायाला वाचा फोडता येते व स्त्रियांना समाजात मानाचे स्थान मिळते असे त्यांनी सांगितले. प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना प्रा.जरांगे एस. ए. सर यांनी बालहक्का संबंधी माहिती सांगून स्वयंसेवकांना शिक्षणाबद्दल प्रोत्साहित केले. या बौद्धिक सत्राचा अध्यक्ष समारोप करताना उपप्राचार्य डॉ. गवारे एन.बी. सर म्हणाले की भारतीय समाजात मुलीबद्दल असलेला दृष्टिकोन बदलला पाहिजे. त्यासाठी मुलींना शिक्षणाची खरी गरज आहे. पुरुषाचे वर्चस्व असलेल्या समाजात स्त्रियांना समान संधी दिली पाहिजे.समाजात होणारे बालविवाह थांबले पाहिजेत. युवक सुशिक्षित झाले पाहिजेत आणि त्यांच्या हक्काची जाणीव त्यांना झाली पाहिजे असे त्यांनी सांगितले.

या प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरार्थ्यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. या कार्यक्रमाचे संचलन, प्रास्ताविक आणि आभार रा. सो. यो.च्या स्वयंसेवक केले. याप्रसंगी मौजे महासांगवी येथील ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

**दिनांक १८/०१/२०२३ - बुधवार रोजीसायंकाळी ८.०० वाजता श्रीमती सुरेखा खेडकर यांचे 'हुंडाबळी-**







दिनांक १८/०१/२०२३ - बुधवार रोजीसायंकाळी ८.०० वाजता श्रीमती सुरेखा खेडकर यांचे 'हुंडाबळी' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कदम सर होते त्या प्रमुख पाहुणे म्हणून सुरेखा खेडकर यांची उपस्थिती होती. प्रथमतः राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून बोलत असताना श्रीमती सुरेखा खेडकर म्हणाल्या की, भारतीय संस्कृतीला लागलेला एक काळा डाग म्हणजे हुंडाबळी होय.आज एकीकडे भारतीय समाजात स्त्री पुरुष समानता असताना देखील महिलांना हुंडाबळीला सामोरे जावे लागते. हुंडा पद्धतीमुळे मुलीचा जन्म नाकारला जातो. त्यामुळे दिवसेंदिवस समाजात मुलींची संख्या ही कमी होत चाललेली आहे.समाजात हुंडा पद्धती विरुद्ध जनजागृती होणे

आवश्यक आहे असे आवाहन त्यांनी केले. अध्यक्षीय समारोपात बोलत असताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कदम सरयांनी समाजातील मुलींचे स्थान, हुंडा पद्धती, हुंडा प्रतिबंधक कायदे याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

या प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरार्थ्यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. या कार्यक्रमाचे संचलन, प्रास्ताविक आणि आभार रा. सो. यो. च्या स्वयंसेवक केले. याप्रसंगी मौजे महासांगवी येथील ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

**दिनांक १९/०१/२०२३ - गुरुवार - 'लोकशाहीत नव मतदाराची भूमिका'**

दिनांक १९/०१/२०२३ - गुरुवार रोजी सकाळी गावात स्वच्छता अभियान राबविण्यात आले व स्वच्छतेचा संदेश गावकऱ्यांना देण्यात आला. त्याच बरोबर 'नव मतदार' या संबंधी जनजागृती रॅली काढण्यात आली.





दुपारच्या बौद्धिक सत्रात ‘लोकशाहीत नव मतदारांची भूमिका’ या विषयावर उदबोधन सत्र ठेवण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.डॉ.सय्यद एस. आर.सर होते तर प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. देवगुडे ए. एन. यांची उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे म्हणून प्राकेशवसुर्वेसर उपस्थित होते तर व्यासपीठावर प्रा.डिसले बी. ए. यांची उपस्थिती होती. प्रथमतः राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.




विशेष शिबिराच्या तिसऱ्या दिवशी प्रमुख वक्ते म्हणून बोलताना प्रा. डॉ. देवगुडे ए. एन.सर यांनी लोकशाहीत नव मतदारांची भूमिका स्पष्ट केली. लोकशाही जपायची

असेल, तर ती आधी आपल्या जगण्यात रुजवायला हवी. घटनेत उल्लेख केलेल्या स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या मूल्यांच्या आधारे ती जगण्यात आणता येईल. त्या आधी तरुण पिढीनं आपलं नाव मतदारयादीत नोंदवायला हवं आणि मतदानही करायला हवं असे आव्हान केले. प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना प्रा. केशव सुर्वे सरम्हणाले की जी व्यक्ती भारत देशाची नागरिक आहे व वयाची अठरा वर्षे पूर्ण केलेले आहेत. अशा व्यक्तीला भारतीय राज्यघटनेने म्हणजेच,भारतीय संविधानाने मतदान करण्याचा अधिकार हा दिलेला आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने आपल्या मताधिकाराचे महत्त्व समजून घेऊन, कोणताही भेदभाव न करता, देशाच्या विकासात न्याय्यपणे सहकार्य करणारा आणि जनतेच्या हितासाठी आणि विकासासाठी काम करणारा प्रतिनिधी निवडण्यासाठी सहकार्य केले पाहिजे.थोडक्यात काय तर लोकशाहीमध्ये मतदान करणे हे गरजेचे आहे.या बौद्धिक सत्राचा अध्यक्ष समारोप करताना प्रा. डॉ. सय्यद एस. आर. सर म्हणाले की आपण सर्वांनी आपल्या मताचा वापर करून आपल्या देशाचे चांगले भविष्य घडविण्याचा विचार केला पाहिजे.आपल्या देशाच्या भवितव्यासाठी मतदार जागृती खूप महत्त्वाची आहे.आपला भारत देश एक लोकशाही प्रजासत्ताक आहे, जिथे लोक राज्य करतात, लोक त्यांच्या मताधिकाराचा वापर करून अशा व्यक्तीची निवड करतात, जो देशाच्या विकासासाठी सक्षम असेल आणि देशाची सूत्रे कुशलतेने हाताळू शकेल. प्रत्येक व्यक्तीचे मत हे खूप मौल्यवान आहे, कारण एका मतातही सरकार पाडून ते बनवण्याची ताकद असते, पण आजही अनेकांना आपला मताधिकार वापरण्याची जाणीव नाही.भारत ही जगातील सर्वात मोठी लोकशाही आहेअसे त्यांनी सांगितले.

या प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरार्थ्यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. या कार्यक्रमाचे संचलन, प्रास्ताविक आणि आभार रा. सो. यो. च्या स्वयंसेवक केले. याप्रसंगी मौजे महासांगवी येथील ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

**दिनांक १९/०१/२०२३ - गुरुवार रोजी सायंकाळी ८.०० वाजता 'ऊस उत्पादन आणि फलोत्पादन प्रक्रिया' –**





दिनांक १९/०१/२०२३ - गुरुवार रोजी सायंकाळी ८.०० वाजता कृषीतज्ज्ञ श्री.विलास कदम आणिश्री. नाईकवाडेसाहेब, कृषीअधिक्षक, पुणे यांचे 'ऊसउत्पादन आणि फलोत्पादन प्रक्रिया' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कदम सर होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून कृषीतज्ज्ञ श्री. विलास कदम आणि श्री. नाईकवाडे साहेब, कृषीअधिक्षक, पुणे. हे उपस्थित होते. तर व्यासपीठावरमौजे महासांगवी येथील सरपंच

श्री. नामदेव सानप, श्री.मधुकर गर्जे, संतोष गर्जे यांची उपस्थिती होती. प्रथमतः राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

कृषीतज्ञ श्री. विलास कदम सर यांनी 'ऊस उत्पादन' या विषयी सविस्तर असे मार्गदर्शन केले. ऊस ही एक तृणवर्गीय वनस्पती आहे. ऊस मुख्यत्वे गुळासाठी, साखरेसाठी पिकवण्यात येतो. भारत व ब्राझीलया देशांत हा प्रामुख्याने पेरला जातो. भारतात महाराष्ट्र व उत्तरप्रदेश ही राज्ये ऊस पिकवण्यात अग्रेसर आहेत. ऊस हे वार्षिक पीक आहे. उसाच्या पेरापासून (खोडाच्या तुकड्यापासून) नवीन रोप लावतात. उसाला काळी कसदार जमीन लागते, कारण उसाला खूप पोषकद्रव्ये लागतात. लागण व खोडवा या ऊस पिकवण्याच्या २ पद्धती आहेत. उसापासून मोठया प्रमाणात साखर मिळते.साखर कारखान्यांमध्ये उसापासून साखर बनविली जाते. मळी, इथेनॉल व बग्यास- चिपाड (रस काढून उरलेला चोथा) हे उसापासून मिळणारे उप-पदार्थ आहेत. मळीपासून पिण्याची दारू बनवता येते. उसाच्या चिपाडापासून पेपर बनविला जातो. बग्यास वापरून वीजनिर्मिती केली जाते. उसापासून साखर तयार होते असे सांगितले.

फलोत्पादन प्रक्रिया या विषयावर श्री. नाईकवाडे साहेब, कृषीअधिक्षक, पुणे यांनी मार्गदर्शन केले. जमिनीत फळबाग लागवड करताना जमिनीची निवड ही सगळ्यात महत्त्वाचे असते. जमिनीचा पोत चांगला नसला तर फळबागेची वाढ समाधानकारक होत नाही. त्यासाठी फळबाग लागवडीपूर्वी जमिनीची योग्यता तपासून घेणे गरजेचे असते.पीक पध्दतीमधील बदल, फळबाग लागवड यासारखे प्रयोग हे केवळ उत्पादनवाढीसाठीच राबवले जातात.पारंपरिक शेतीमधून अपेक्षित उत्पन्न मिळत नाही.फळबाग लागवडीमधून उत्पन्न तर वाढणार आहेच पण फळविक्रीतून व्यवसायही करता येतो. फळबागाचे क्षेत्र वाढवण्यासाठी प्रशासकीय स्तरावर एक ना अनेक योजना राबवल्या जात आहेत. अनुदानाचा लाभ घेऊन फळबाग क्षेत्र वाढवता येते. याचाच लाभ आता शेतकरी घेऊ लागले आहेत असे सांगितले. अध्यक्षीय समारोपात बोलत असताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कदम सर यांनीभारत देश हा कृषिप्रधान देश आहे. त्यासाठी प्रत्येक तरुणाने शेती सांभाळली पाहिजे असे सांगितले.या प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरार्थ्यांनी पाहुण्यांचा

परिचय करून दिला.या कार्यक्रमाचे संचलन, प्रास्ताविक आणि आभार रा. सो. यो. च्या स्वयंसेवक केले. याप्रसंगी मौजे महासांगवी येथील ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

**दिनांक २०/०१/२०२३ - शुक्रवार - 'नविन शैक्षणिक धोरण आणि उच्चशिक्षण'**

दिनांक २०/०१/२०२३ - शुक्रवार रोजी सकाळी गावात स्वच्छता अभियान राबविण्यात आले व स्वच्छतेचा संदेश गावकऱ्यांना देण्यात आला. पाणी व्यवस्थापनासाठी श्रमदान करण्यात आले.








दुपारच्या बौद्धिक सत्रात 'नविन शैक्षणिक धोरण आणि उच्चशिक्षण' या विषयावर उदबोधन सत्र ठेवण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. अहिरे बी.एम. सर होते तर प्रमुख वक्ते म्हणून प्रा. विनोद किर्दक यांची उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा डॉ. वंदन जाधव सर उपस्थित होते तर व्यासपीठावर प्रा. प्रकाश नाईकवाडे यांची उपस्थिती होती. प्रथमतः राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.




विशेष शिबिराच्या चौथ्या दिवशी प्रमुख वक्ते म्हणून बोलताना प्रा. विनोद किर्दक सर यांनी नविन शैक्षणिक धोरण आणि उच्चशिक्षणयाविषयी सविस्तर असे मार्गदर्शन केले. केंद्र सरकारने तब्बल चौतीस वर्षानंतर नविन शैक्षणिक धोरण जाहीर केले आहे. सध्याच्या शिक्षण व्यवस्थेतील विविध समस्या आणि उणिवांचा अभ्यास करून भविष्यातील गरजांचा वेध घेऊन विद्यार्थ्यांना बदलत्या काळासाठी सज्ज करण्याची जबाबदारी प्रामुख्याने शिक्षण व्यवस्थेतील प्रत्येक घटकाची आहे. त्यामुळे या धोरणात अनेक उपाय/ बदल सुचवलेले आहेत. त्यानुसार २०२० मध्ये जाहीर झालेले हे धोरण येत्या २०३० पर्यंत टप्प्याटप्प्याने पूर्णपणे प्रत्यक्षात आणायचे आहे. नवीन शैक्षणिक धोरणाचे महत्वाचे मुद्दे म्हणजे भारताला जागतिक ज्ञान महासता बनविणे हे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चे अंतिम उद्दीष्ट आहे. मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे नाव बदलून शिक्षण मंत्रालय ठेवले गेले. 1947 मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यापासून भारतातील शिक्षण प्रणालीतील हा तिसरा मोठा बदल आहे.एनईपी 2020 च्या पूर्वी 1968 आणि 1986 मध्ये शैक्षणिक यंत्रणेत सुधारणा झाली.शालेय शिक्षणातील गुंतवणुकीमध्ये लाक्षण्कि वाढ करणे नवनवीन उपक्रम राबविणे.इसवी सन 2025 पर्यंत पाचवी व त्यापुढील इयत्तेतील प्रत्येक विद्यार्थ्यास पायाभूत साक्षरता व तंत्रज्ञान आत्मसात होत असल्याची दक्षता घेणे.शालेय शिक्षणासाठी ५+३+३+४ रचनेवर आधारित बौद्धिक विकास व अध्ययनाच्या तत्त्वांवर आधारित

अभ्यासक्रम व अध्यापन शास्त्र रचना विकसित करण्यात आली आहे असे सांगितले. प्रमुख पाहुणे म्हणून बोलतानाप्रा डॉ. वंदन जाधव म्हणाले की 34 वर्षानंतर आणि 21 व्या शतकातील पहिली शैक्षणिक सुधारणा 2020 मध्ये करण्यात आली. २९ जुलै, २०२० रोजी विद्यमान भारतीय शिक्षण पद्धतीत अनेक बदल घडवून आणण्याच्या उद्देशाने मंत्रिमंडळाने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला मान्यता दिली.1968 मध्ये देशाचे पहिले शैक्षणिक धोरण इंदिरा गांधी सरकार मध्ये मांडण्यात आले. हे शैक्षणिक धोरण 1964 च्या कोठारी आयोगाच्या शिफारशींवर आधारित होते. १०+२+३ शैक्षणिक प्रणाली स्वीकारण्यात आलेली होती. यासोबत त्रिभाषा सूत्र अवलंबण्यात आलं होतं. यामध्ये प्रथम भाषा मातृभाषा,द्वितीय भाषा राष्ट्रभाषा (हिंदी), तृतीय भाषा म्हणून इंग्रजीचा स्वीकार करण्यात आलेला होता.

सर्वसाधारणपणे याच शिफारशींवर आधारित 1986 मध्ये दुसरे शैक्षणिक धोरण राजीव गांधी सरकारने मांडले. या धोरणामध्ये “विशेषत: भारतीय महिला, अनुसूचित जमाती (अनुसूचित जमाती) आणि अनुसूचित जाती (एससी) समुदायांसाठी असमानता दूर करण्यासाठी आणि शैक्षणिक संधी समान करण्यावर विशेष भर दिला गेला.या धोरणांमध्ये 1992 च्या नरसिंह राव सरकारने बदल सुचवला आणि काही सुधारणा करण्यात आल्या. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० धोरणासाठी पुन्हा दुसरा प्रयत्न माजी इस्त्रो अध्यक्ष के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी बनवून करण्यात आला. या बौद्धिक सत्राचा अध्यक्ष समारोप करताना प्रा. डॉ.अहिरे बी. एम. यांनी उच्चशिक्षनावर प्रकाश टाकला.

या प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरार्थ्यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. या कार्यक्रमाचे संचलन, प्रास्ताविक आणि आभार रा. सो. यो. च्या स्वयंसेवक केले. याप्रसंगी मौजे महासांगवी येथील ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

**दिनांक २०/०१/२०२३ - शुक्रवार रोजी सायंकाळी ८.०० वाजता मौजे महासांगवी येथील ग्रामस्थासाठी सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन -**

दिनांक २०/०१/२०२३ - शुक्रवार रोजी सायंकाळी ८.०० वाजता मौजे महासांगवी येथील ग्रामस्थासाठी सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी विविध कार्यक्रमांचे सादरीकरण करून ग्रामस्थांना स्वच्छतेचा संदेश दिला. विविध गीतांवर नृत्य, नाटिका, गीत गायन, मिमिक्री, आदि कलागुण सादर करत ग्रामस्थ कलावंत, विद्यार्थी कलावंतांनी तसेच शिबिरातील कलावंतांनी गावकऱ्यांचे मनोरंजनातून प्रबोधन केले. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी तसेच मौजे महासांगवी येथील ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

**दिनांक २१/०१/२०२३ - शनिवार - 'ग्रामीण विकासात युवकांचे योगदान'**

दिनांक २१/०१/२०२३ - शनिवार- रोजी सकाळी गावात आरोग्यासंबंधी जनजागृती रॅली काढण्यात आली तसेच स्वच्छता अभियान राबविण्यात आले व स्वच्छतेचा संदेश गावकऱ्यांना देण्यात आला. महासांगवी गावात राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी ठिकठिकाणी वृक्षारोपण केले.





दुपारच्या बौद्धिक सत्रात 'ग्रामीण विकासात युवकांचे योगदान' या विषयावर उदबोधन सत्र ठेवण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. प्रधान आर. जे.सर होते तर प्रमुख वक्ते म्हणून प्रा. घाडगे एस. व्ही. यांची उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा डॉ. संभाजी जाधव सर उपस्थित होते तर व्यासपीठावर प्रा.

डॉ.सरपटे.बी. ए. आणिप्रा. गोपाळ धांडे यांची उपस्थिती होती. प्रथमतः राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.




विशेष शिबिराच्या पाचव्यादिवशी प्रमुख वक्ते म्हणून बोलताना प्रा. घाडगे एस. व्ही.सर म्हणाले की, आजचा ग्रामीण युवक हा काळानुरूप बदल स्वीकारत आहे. अनेक जण विविध परीक्षांमध्ये चमकताना दिसतात. तरीही ग्रामीण भागात मार्गदर्शन, पायाभूत सुविधांची कमतरता खूप मोठ्या प्रमाणात आहे सध्या पर्यावरण ढासळत असल्याने सर्वत्र चिंता वाढली आहे. पर्यावरण वाचवण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत. खेडे हे आपल्या देशाचे हृदय आहे. खेडे हा विकासाचा महत्त्वाचा घटक आहे. जोपर्यंत खेड्याचा विकास होत नाही तोपर्यंत देशाचा विकास झाला असे आपण मान्य करू शकत नाही. तसं पाहिलं तर आधी खेडे तयार झाली आणि नंतर शहरे अस्तित्वात आली. महात्मा गांधी नेहमी म्हणायचे कि खेड्याकडे चला हा त्यांचा संदेश आजही तंतोतंत लागू होतो. कर्मयोगी गाडगे महाराज व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी सुद्धा आपल्या कीर्तनातून व कृतीमधून खेड्यांचे महत्त्व पटवून दिले आहे. मित्रांनो राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची ग्रामगीता ही ग्रामविकास वरच आधारित आहे. संत तुकडोजी महाराज म्हणतात ‘गावचा नकाशा

हाच देशाचा नकाशा व गावावरून देशाची परीक्षा'. तर कर्मयोगी गाडगे महाराजांनी स्वच्छतेचा मंत्र आपल्या सर्वांना दिला आहे.

प्रमुख पाहुणे बोलताना प्रा. डॉ. संभाजी जाधव म्हणाले की गाव विकास म्हंटले कि जेष्ठ समाजसुधारक अण्णा हजारे यांचे राळेगण सिद्धी, सन्मानीय पोपटराव पवार यांचे हिवरे बाजार नगर आणि सन्मानीय भास्कर पेरे यांचे पाटोदा खेडे औरंगाबाद ही डोळ्यासमोर येतात. म्हणुन युवकांनी ग्रामविकासावर भर दिला पाहिजे.युवकांनी गावांमध्ये दरवर्षी किमान शंभर वृक्ष लावले जातील व त्याचे संवर्धन होईल हा कार्यक्रम हाती घेणे महत्त्वाचे आहे . लहान बंधारे जलसंवर्धन यासारखी छोटी कामे श्रमदान व शासनाच्या निधि मधून पूर्ण करण्यासाठी पुढे येणे आवश्यक आहे. यासाठी ग्रामविकास विभाग,कृषी विभाग व जलसंधारण विभाग या कार्यालयाची संघटितपणे संपर्क साधण्याची आवश्यकता आहे. गावामध्ये गावपण व माणुसकीपण जपणे हे सुद्धा तितकेच महत्त्वाचे आहे. व्यसनाधीनता व अविचार पासून गावाला दूर ठेवले पाहिजे जोपर्यंत युवक ग्रामविकास यामध्ये सहभागी होणार नाही तोपर्यंत गावाचा विकास होणार नाही.या बौद्धिक सत्राचा अध्यक्ष समारोप करताना प्रा. डॉ. प्रधान आर. जे. म्हणाले की,गावापासून मला काय मिळते यापेक्षा मी गावाला काय देऊ शकतो? माझे काय योगदान आहे? सर्वांमध्ये ही भावना येणे आवश्यक आहे. यासाठी समाजाच्या दृष्टीची व विकास दृष्टीची पिढी निर्माण करण्याची आवश्यकता आहे.या प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरार्थ्यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. या कार्यक्रमाचे संचलन, प्रास्ताविक आणि आभार रा. सो. यो. च्या स्वयंसेवक केले. याप्रसंगी मौजे महासांगवी येथील ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

**दिनांक २१/०१/२०२३ - शनिवार रोजी सायंकाळी ८.०० वाजता संत मीराबाई संस्थान महासांगवीच्या मठाधिपती ह. भ. प. राधाताई महाराजयांचे 'वारकरी संप्रदाय आणि आजचा युवक'**



दिनांक २१/०१/२०२३ - शनिवार रोजी सायंकाळी ८.०० वाजता संत मीराबाई संस्थान महासांगवीच्या मठाधिपती ह. भ. प. राधाताई महाराज यांचे 'वारकरी संप्रदाय आणि आजचा युवक' याविषयी प्रवचन घेण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कदम सर होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून संत मीराबाई संस्थान महासांगवीच्या मठाधिपती ह. भ. प. राधाताई महाराज हया होत्या. प्रथमतः राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना ह भ. प. राधाताई महाराजयांनी 'वारकरी संप्रदाय आणि आजचा युवक' यावर प्रवचन दिले.त्या म्हणाल्या की महाराष्ट्रातील एक अत्यंत लोकप्रिय भक्तिसंप्रदाय. वारकरी संप्रदायाला 'माळकरी संप्रदाय' असेही एक पर्यायी नाव आहे. प्रत्येक वारकऱ्याच्या गळ्यात तुळशीच्या १०८ मण्यांची माळ असते. इतर अनेक धर्मपंथांत माळेला स्मरणी म्हणून महत्त्व आहेच; पण वारकरी संप्रदायात ही तुळशीच्या मण्यांची माळ घातल्याखेरीज कोणाला वारकरी होताच येत नाही.पंढरपूरचा विठोबा हे वारकरी संप्रदायाचे उपास्य दैवत असल्यामुळे वारकऱ्यांचे मुख्य क्षेत्र पंढरपूर आणि तीर्थ चंद्रभागा होय.प्रत्येक वारकरी पंढरपूरची वारी वर्षातून

किमान एकदा तरी करतोच, तथापि ज्ञानदेवांनी समाधी घेतल्यानंतर कार्तिक वद्य एकादशीसही वारकरी आळंदीला जातात.थोर संत आणि वारकरी नामदेव हे आद्य कीर्तनकार मानले जातात.

'नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी' ही नामदेवांची भूमिका होती. भजनकीर्तनांच्या योगे विठ्ठलाची किर्ती त्यांनी भारतात अनेक ठिकाणी हिंडून पोहोचविली.सर्वधर्म समभावाची शिकवण देणारा जगाच्या पाठीवर एकमेव संप्रदाय म्हणजेवारकरी संप्रदाय.आपण आज म्हणतो कि सर्व समाजाने एकत्र आले पाहिजे मात्र हे कार्य १२ शतकापासून आमचे साधू संत करत आलेत आणि आजतागायत पणेअविरतसुरूआहे. आजच सरकार म्हणत कि स्त्री शिक्षण स्त्रियांना समाजात माण सन्मान दिला पाहिजे. मात्र आपल्या माहितीकरिता समाजात सध्या ज्या स्त्रिया वेश्या व्यवसाय करतात त्यांना आता काय किमत आहे पण आमच्या कान्होपत्र अशा कुळात जन्माला येऊन हि संत या पदाला जाऊन पोहचल्या हि क्रांती केवळ वारकरी संप्रदायच करू शकला. संप्रदायात तेव्हा पासून आज पर्यंत आणि पुढे स्त्रियांना मंच स्थान आहे याच मूर्तिमंत उदाहरण आमच्या चिमुकल्या मुक्ताई, सोयराबाई, जनाबाई, भगीरथी जी, बहिणाबाई कित्येक नाव आपल्या डोळ्यांसमोर येतील .आमचा भगवंत यांची भक्ती पाहून यांच्या सोबत काम करयचा इतका मोठा स्त्रियांना माण सन्मान केवळ वारकरी संप्रदायच देऊ शकला आज तागायत . आज नोकरवर्गास काय किमत देतात वरिष्ठ मात्र आमचे गावबा जे कि काम करण्याकरिता नाथमहाराजांच्या घरी राहिले पडेल ते काम केल व अखेर संत या पदाला जाऊन पोहचले असे त्यांनी सांगितले.




अध्यक्षीय समारोपात बोलत असताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कदम सर यांनी वारकरी संप्रदाय आणि युवक यावर प्रकाश टाकला. संतांच्या वास्तव्यामुळे तीर्थक्षेत्र पवित्र मानली गेली आहेत. श्रोत्यांच्या मनांत भक्तिरसाचा परिपोष करणे, तसेच संप्रदायाचा प्रसार करणे हे कीर्तनाचे महत्त्वाचे हेतू आहेत असे त्यांनी सांगितले. या प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरार्थ्यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. या कार्यक्रमाचे संचलन, प्रास्ताविक आणि आभार रा. सो. यो. च्या स्वयंसेवक केले. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारीतसेच मौजे महासांगवी येथील ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

**दिनांक २२/०१/२०२३ रविवार- 'पर्यावरणासाठी जलव्यस्थापन, वृक्षारोपण आणि स्वछता'**

दिनांक २२/०१/२०२३ - रविवार रोजी सकाळी गावात स्वच्छता अभियान राबविण्यात आले व स्वच्छतेचा संदेश गावकऱ्यांना देण्यात आला. पाणी व्यवस्थापनासाठी श्रमदान करण्यात आले. महासांगवी गावात राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी ठिकठिकाणी वृक्षारोपण केले.




दुपारच्या बौद्धिक सत्रात 'पर्यावरणासाठी जलव्यस्थापन,वृक्षारोपण आणि स्वछता' या विषयावर उदबोधन सत्र ठेवण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. लोखंडे बी.बी.सर होते तर प्रमुख वक्ते म्हणून प्रा. जोशी बी. डी. यांची उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा डॉ. गोविंद बामदळेसर उपस्थित होते तर व्यासपीठावर प्रा. भोरे एस. एस.यांची उपस्थिती होती. प्रथमतः राष्ट्रीय सेवा योजनात्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.




विशेष शिबिराच्या सहाव्या दिवशी प्रमुख वक्ते म्हणून बोलताना प्रा. जोशी बी. डी. सर म्हणाले की, निसर्ग मानवाला खूप काही देत असतो याची जाण ठेवून,निसर्गाचंदेणआहे या कृतज्ञतेच्या भावनेतून प्रत्येक नागरिकांनी पर्यावरणाचे जतन संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी आपापल्या घरासमोती एक तरी झाड लावले पाहिजे असे आवाहन केले. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा डॉ. गोविंद बामदळे सरबोलताना म्हणाले की,पर्यावरणाला भेडसावणाऱ्या समस्यांबद्दल आणि त्यांच्याशी लढण्यासाठी आपण काय करू शकतो याची जाणीव आपल्यालाहोणे गरजेचे आहे. पर्यावरणाचा समतोल साधण्यासाठी आपण नेहमीच्या दैनदिंन जीवनात काही गोष्टी केल्या पाहिजेत.जसे की प्लास्टिक टाळणे, अधिक झाडे लावणे, पर्यावरणपूरक वस्तूंचा वापर, पाणी वाचवणे आणि आपले वन्यजीव आणि प्राणी यांचे संरक्षण करणे यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत. या बौद्धिक सत्राचा अध्यक्ष समारोप करताना प्रा. डॉ. लोखंडे बी. बी.सर म्हणाले की, पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व समजून जगभरातील देश वृक्षलागवड व जास्तीतजास्त सीएनजी गॅस चा उपयोग करू लागले आहेत. पर्यावरण आपले भविष्य आहे म्हणून याच्या संरक्षणासाठी आपल्याला वेळीच लक्ष द्यावे लागेल. पर्यावरणाला प्रदूषण मुक्त करण्यासाठी सर्वात आधी जल प्रदूषणाला रोखावे लागेल. कारखान्यांचे खराब पाणी, घरातील दूषित पाणी, नाल्यामधून वाहणारा मल इत्यादी समुद्रात जाण्यापासून रोखले गेले

पाहिजे.कारखान्यातून निघणारे विषयुक्त पाणी पिऊन जलचर व उभयचर प्राण्यांची मृत्यू होते दुसरी कडे त्याच प्रदूषित पाण्याला शेतात वापरले जाते व दूषित पाण्यात उगवलेला भाजीपाला खाऊन आपले आरोग्य बिघडण्याचा धोका असतो. प्रत्येकाने पर्यावरणाचे जतन आणि संवर्धन केले पाहिजे असे त्यांनी सांगितले. महासांगवी गावात राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी ठिकठिकाणी वृक्षारोपण केले. कार्यक्रमाचे संचलन, प्रास्ताविक आणि आभार रा. सो. यो. च्या स्वयंसेवक केले. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी तसेच मौजे महासांगवी येथील ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

**दिनांक २२/०१/२०२३ - रविवार रोजी सायंकाळी ८.०० वाजता प्रा. मुंडे ए.आर. यांचे भगवान बाबा यांचे पूर्वगामी विचार -**

दिनांक २२/०१/२०२३ - रविवार रोजी सायंकाळी ८.०० वाजता प्रा. मुंडे ए. आर. यांचे भगवान बाबा यांचे पूर्वगामी विचार यावर प्रवचन घेण्यात आले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कदम सर होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. मुंडे ए. आर. यांची उपस्थिती होती. प्रथमतः राष्ट्रीय सेवा योजना त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. मुंडे ए. आर. सर यांनी भगवान बाबा यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला.भगवानबाबांनी महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात कीर्तनाच्या माध्यमातून शैक्षणिक, सामाजिक, नैतिक व सांस्कृतिक प्रबोधन केले. भक्तिमार्ग, कर्ममार्ग व ज्ञानमार्ग यांचा त्रिवेणी समन्वय त्यांनी साधला होता. तो त्यांच्या कीर्तनातही दिसून येई. कीर्तनकार म्हणून त्यांना प्रचंड लोकप्रियता मिळाली होती. आपल्या कीर्तनांतून ते जातिभेद, धर्मभेद, अज्ञान, अंधश्रद्धा, अनिष्ट रुढी-परंपरा यांच्यावर प्रहार करीत. प्रबोधनकार्यासाठी त्यांनी मराठवाडा, विदर्भ, तेलंगना, आंध्रप्रदेश, कर्नाटकातील काही भाग व पश्चिम महाराष्ट्रासह उभा महाराष्ट्र पिंजून काढला. विठ्ठनामाचा प्रचार करतानाच त्यांनी समता, बंधुता, एकता, मानवता यांसारख्या आधुनिक विचारांचा आयुष्यभर प्रचार केला. त्यामुळेच वारकरी धर्माला आधुनिक रूप देणारे संत म्हणून त्यांना ओळखले जाते. अध्यक्षीय समारोपात बोलत असताना महाविद्यालयाचे

प्राचार्य डॉ. विश्वास कदम सर यांनीभगवान बाबा यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला.या कार्यक्रमाचे संचलन, प्रास्ताविक आणि आभार रा. सो. यो. च्या स्वयंसेवक केले. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी तसेच मौजे महासांगवी येथील ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

**दिनांक २३/०१/२०२३ - सोमवार- शिबिराचा समारोप समारंभ -**

जयभवानी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मौजे महासांगवी ता. पाटोदा जि. बीड या दत्तक गावात प्रति वर्षाप्रमाणे सन 2022-23 मध्ये दिनांक १७/०१/२०३३ते २३/०१/२०२३ या दरम्यान घेण्यात आलेल्या'युवकांचा ध्यास ग्राम - शहर विकास' विशेष युवक-युवती शिबिराचा समारोप कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.




या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. नानासाहेब गवारेसर हे होते तर समारोपाच्या प्रसंगी मा. श्री.शिवभूषण जाधव ह. भ. प.कृष्णा महाराज केकाण,सरपंच चैताली नामदेव सानप, उपसरपंच केशव गर्जे, उद्योगपती विलासराव जायभाये, मधुकर गर्जे, श्री. योगेशसानप तसेच व्यासपीठावर महासांगवी गावातील ग्रामस्थ उपस्थित होते. सर्वप्रथम राष्ट्रपिता महात्मा गांधी व राष्ट्रसंत

गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा. श्रीमती ज्योती रकटे यांनी केले. याप्रसंगी प्रास्ताविकातून शिबिरात आयोजित करण्यात आलेल्या गेल्या सात दिवसातील विविध कामाचा आढावा तसेच आयोजीत कार्यक्रमाची माहिती देण्यात आली. या शिबिरात दररोज उद्‌बोधन सत्र, स्वच्छता मोहीम, वृक्ष लागवड, बंधाऱ्याची निर्मिती करण्यात आली. यावेळी सामाजिक कार्यकर्त्या सुरेखा खेडकर यांनी प्रबोधन केले. तसेच कृषी विभागाच्या वतीने शेतकऱ्यांना छान माहिती देण्यात आली. संत मीराबाई संस्थान महासांगवी व संपूर्ण गावातील स्वचछता करण्यात आली. या कार्यक्रमा दरम्यान संपूर्ण महासांगवीगावचा कायापालट झाला असून गावाचा चेहरा मोहरा बदलला आहे. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबीरार्थी स्वयंसेवकांनी आपले मनोगत व्यक्त केले.







प्रमुख पाहुण्यांच्या शुभहस्ते प्रमाणपत्र वाटप करण्यात आले प्रमुख पाहुणे म्हणून बोलत असताना ह. भ. प. कृष्णा महाराज केकाण म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजनेचे मुख्य उद्दिष्ट महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीयत्वाची जाणीव निर्माण करून त्यांना सामाजिक कार्याचा सराव करण्यास वाव देणे, हे आहे.








राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणत, "गाव हा विश्वाचा नकाशा । गावावरून देशाची परीक्षा । गाव भंगता येईल अवदशा । देशामाजी ।।" म्हणून राष्ट्राचा उद्धार व्हावा असे वाटत असेल तर आधी ग्रामोद्धार झाला पाहिजे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्‌यार्थ्यांनी महासांगवीगावचा कायापालट केला आहे. हे पाहून खूप आनंद होतो आहे असे ते म्हणाले. अध्यक्षीय समारोपात बोलत असताना

महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. नानासाहेब गवारे यांनी महासांगवी गावातगेल्या सात दिवसातील केलेल्या कामाचा आढावा घेऊन राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना राष्ट्रीय सेवा योजनेच्या ब्रीद वाक्याची जाणीव करून देत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.






महासांगवी गावातील केलेल्या कामाची पाहणी प्रमूख पाहुण्यांनी केली

त्यांनतर शिबीरार्थी स्वयंसेवकांनी तसेच प्रमूख पाहु ण्यांनी स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला.









स्नेहभोजना नंतर शिबिराची सांगता झाली. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कदम सर यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. ज्योती रकटे, प्रा.डॉ.बंडू लोखंडे, प्रा.शिवाजी भोरे,प्रा. बाळासाहेब जोशी,कू.दिव्या घुमरे, सौ.साळूबाई नाईकनवरे, श्री. कुणाल काळे तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद यांनी परिश्रम घेतले.